याचिकाकर्ते सर्वश्री.गणपतराव छोटूजी गभने व इतर १३ विरुध्द महाराष्ट्र शासन (रिट याचिका क्रमांक १८६८/२००५) प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्या दिनांक १४.६.२०१७ रोजीच्या न्यायनिर्णयानुसार कार्यवाही करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-२००५/प्र.क्र.१४१/२००५(२०१७)/स्वासैक-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक-०६ मार्च, २०१८.

वाचा: - १) Government Resolution, General Administration Department, No. POS/ १०७७/S. Cell-I-FF, Mantralaya, Bombay ४०००३२, Dt.२६/९/१९७७.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. पीओएस १०८२/क १/स्वा.सै,दि.१६/२/१९८२

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. पीओएस १०८२/क १/स्वा.सै,दि.६/९/१९८२

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. पीओएस १०९४/प्र.क्र.३०१/स्वासैक१, दि. २४/१०/१९९४

५) शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय क्र. संकीर्ण २००४/ प्र.क्र.१६१/ ०४/ स्वासैक १, दिनांक १६/११/२००४

६) मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांचा न्यायनिर्णय दिनांक १४/६/२०१७.

प्रस्तावना :-

गोवा मुक्ती संग्रामातील ज्या स्वातंत्र्य सैनिकांना केंद्र शासनाचे सन्मान निवृत्तीवेतन पूर्वलक्षी प्रभावाने मंजूर झाले अशा स्वातंत्र्यसैनिकांना केंद्र शासनाने निवृत्तीवेतन मंजूर केलेल्या दिनांकापासून राज्य शासनाचे पूर्ण निवृत्तीवेतन देण्याऐवजी दरमहा रु. ५००/- प्रमाणे अतिरिक्त सन्मान निवृत्तीवेतन देण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला होता.

२. यासंदर्भात देण्यात आलेल्या संदर्भीय क्र.५ येथील शासन आदेशाच्या विरोधात सर्वश्री गणपतराव छोटूजी गभने व इतर १३ (जिल्हा नागपूर ९, यवतमाळ ४ व वर्धा १) यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.१८६८/२००५ दाखल केली होती.

३. सदर याचिकेवर मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी दिलेल्या दिनांक १४.६.२०१७ च्या न्यायनिर्णयाची अंमलबजावणी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र. १८६८/२००५ वर दिनांक १४.६.२०१७ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयास अनुसरुन प्रस्तुत १४ याचिकाकर्त्यांना (सहपत्रात नमूद केल्याप्रमाणे) दिनांक १६.११.२००४ पासून ते न्यायनिर्णयाच्या दिनांकापर्यत म्हणजेच माहे जून, २०१७ पर्यंत द.म.रु. ३०००/- (रु.तीन हजार फक्त) प्रमाणे पूर्वलक्षी प्रभावाने (यापूर्वी थकबाकी दिली असल्यास ती रक्कम वजा करून) राज्य शासनाचे मानधन अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. माहे नोव्हेंबर २००४ पासून राज्याचे द. म. रु ५००/- इतके मानधन नियमितपणे अदा करण्यात येत

असल्यामुळे प्रत्येक याचिकाकर्त्यास १५१.५ महिने x रु.२५००= रु.३,७८,७५०/- (रु. तीन लक्ष अठ्ठ्याहत्तर हजार सातशे पन्नास फक्त) इतकी रक्कम देय आहे. सबब १४ याचिकाकर्त्यांस १४ x रु.३,७८,७५०= रु. ५३,०२,५००/- (रु.त्रेपन्न लक्ष दोन हजार पाचशे फक्त) इतकी रक्कम अदा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. तसेच सदर १४ याचिकाकर्त्यांचे प्रकरणी शासनाच्या दिनांक १६.११.२००४ च्या पत्रातील सूचनांनुसार निवृत्तीवेतनाच्या अतिप्रदानाची रक्कम वसूल करण्यात आली असल्यास, ती देखील अदा करण्यात यावी.

३. याप्रित्यर्थचा खर्च "मागणी क्र.ए-५, प्रधान लेखाशीर्ष-२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण (६०) इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम (१०२) सामाजिक सुरक्षा योजनेखाली निवृत्तीवेतन (००) (०१) स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती इ. ना निवृत्तीवेतन (२२३५ ००१५) या अर्थसंकल्पिय लेखाशीर्षाखाली चालू आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. वरील आदेशानुसार तात्काळ कार्यवाही करुन जिल्हाधिकारी, नागपूर, वर्धा व यवतमाळ यांनी शासनास व मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांना अहवाल सादर करावा.

५. हा शासन निर्णय दिनांक १५.५.२०१५ अन्वये पुनर्गठीत राज्यस्तरीय स्वातंत्र्यसैनिक उच्चाधिकार समितीच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०७१०४५२५४४०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Suresh Mahadeo Khade

Digitally signed by Suresh Mahadeo Khade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=14c299447f4a6e6c33ab3f7a85fbf010628981e82f8311a81d1cf974681485c2, serialNumber=f0b4c833a6fc7c6fb7cb0a96a3e2bb79d42d283b8f0f7bfc1ae95298d60bacf1, cn=Suresh Mahadeo Khade
Date: 2018.03.07 10:46:35 +05'30'

(सु. म. खाडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) सर्व मा.मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ, मुंबई,
५) मा.राज्यमंत्री, सा.प्र.वि. यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६) महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर (२ प्रती)
७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
८) जिल्हाधिकारी, नागपूर, यवतमाळ, वर्धा (५ प्रती) (By R.P.A.D.) (त्यांना विनंती करण्यात येते की, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल एक महिन्यांत सादर करावा)
९) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर, यवतमाळ, वर्धा

१०) श्री.गणपतराव छोटूजी गभने, गंजीपेठ, शितला माता मंदिर जवळ, नागपूर
११) श्रीमती पार्वतीबाई शंकरराव बावनकर, भाजीमंडी, सिताबोर्डी, नागपूर
१२) श्री.मदन मोहन मुलताचंद आचार्य, १२६, फार्मलँड, रामदास पेठ, नागपूर
१३) श्री.सत्यनारायण चंद्रभूषण शुक्ला, डोसर भवन, पोलीसस्टेशन जवळ, सेंट्रल ॲव्हेन्यू रोड, नागपूर
१४) ॲड.सिताराम विठ्ठलराव खडलोया, १६-बाजोरीया नगर, यवतमाळ,
१५) श्री.गणेश प्रसाद योगेश्वरप्रसाद वाजपेयी, त्रिवेणी छाया, सानेवाडी, वर्धा
१६) श्री.प्रल्हाद कृष्णराव रेभे, गांधी चौक, वणी, यवतमाळ
१७) श्री.रंगराव शामराव देशमुख, धानोरा (S.A.O.), ता.उमरखेड, जि.यवतमाळ
१८) श्री.भगवान शंकर गोरे, पळशी, ता.उमरखेड, जि.यवतमाळ
१९) श्री.पुंडलिक दौलतराव खंडागळे, अयोध्यानगर, व्दारा श्री.राजू गायकवाड, नागपूर
२०) ॲड.रामभाऊ नारायण कोल्हे, रामकृष्ण नगर, वर्धा रोड, नागपूर
२१) श्री.भय्याजी परसराव देशमुख, प्रतापनगर, राकेश भवन, व्दारा श्री.पन्नासे, नागपूर
२२) श्री.रामावतार रामलाल अवस्थी, विवेकानंद नगर, कामठी, नागपूर
२३) श्री.वसंतकुमार अनंतराम चौरसिया, टेकडी रोड, सिताबर्डी, नागपूर
२४) कक्ष अधिकारी, (स्वासैक-१)
२५) निवडनस्ती.

****

शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२००५/प्र.क्र.१४१/२००५(२०१७)/स्वासैक-१,
दिनांक ०६ मार्च, २०१८ चे सहपत्र

मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल रिट याचिका क्र. १८६८/२००५ मधील १४ याचिकाकर्त्यांची नावे---

१. श्री.गणपतराव छोटूजी गभने, गंजीपेठ, शितला माता मंदिर जवळ, नागपूर
२. श्रीमती पार्वतीबाई शंकरराव बावनकर, भाजीमंडी, सिताबोर्डी, नागपूर
३. श्री.मदन मोहन मुलताचंद आचार्य, १२६, फार्मलँड, रामदास पेठ, नागपूर
४. श्री.सत्यनारायण चंद्रभूषण शुक्ला, डोसर भवन, पोलीसस्टेशन जवळ, सेंट्रल ॲव्हेन्यू रोड, नागपूर
५. ॲड.सिताराम विठ्ठलराव खडलोया, १६-बाजोरीया नगर, यवतमाळ,
६. श्री.गणेश प्रसाद योगेश्वरप्रसाद वाजपेयी, त्रिवेणी छाया, सानेवाडी, वर्धा
७. श्री.प्रल्हाद कृष्णराव रेभे, गांधी चौक, वणी, यवतमाळ
८. श्री.रंगराव शामराव देशमुख, धानोरा (S.A.O.), ता.उमरखेड, जि.यवतमाळ
९. श्री.भगवान शंकर गोरे, पळशी, ता.उमरखेड, जि.यवतमाळ
१०. श्री.पुंडलिक दौलतराव खंडागळे, अयोध्यानगर, व्दारा श्री.राजू गायकवाड, नागपूर
११. ॲड.रामभाऊ नारायण कोल्हे, रामकृष्ण नगर, वर्धा रोड, नागपूर
१२. श्री.भय्याजी परसराव देशमुख, प्रतापनगर, राकेश भवन, व्दारा श्री.पन्नासे, नागपूर
१३. श्री.रामावतार रामलाल अवस्थी, विवेकानंद नगर, कामठी, नागपूर
१४ . श्री.वसंतकुमार अनंतराम चौरसिया, टेकडी रोड, सिताबर्डी, नागपूर

****